ePaper

## इस्लाम कोरोनासारखा संपवायला हवा: आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व




वर्ष - 7 । अंक - 123 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 5 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### आतील पानांत


- मिचेल मार्शने केला धमाका!!
- ईमानदारी का क्या करोगे ?
- राहुल गांधीची ना लॉंचिंग ना लॅंडिंग!
- मराठा समाजाच्या पाठीशी...


# स्मॉलस्केल बिल्डरांसाठी रेरा ‘घातक’!

## » मुख्यमंत्र्यांना निवेदन : ‘रेरा’ च्या कामकाजात सुधारणेची मागणी

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (‘यूडीसीपीआर’) मधील बदल छोट्या बांधकाम व्यावसायिकांना (बिल्डर) हानीकारक आहे. २०२१ च्या गटवारीनुसार ठरविण्यात आलेला ५ टक्के ओपन अमेनिटी स्पेसचा नियम हा छोट्या बांधकाम व्यावसायिकांना अतिशय मारक आणि त्रासदायक आहे. त्याचा फेरविचार करण्याची मागणी, पिंपरी-चिंचवडमधील छोट्या बांधकाम व्यावसायिकांनी राज्य शासनाकडे केली आहे. तसेच रेराच्या कामकाजात सुधारणा करण्याचीही मागणी केली आहे.**







याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. शहराची लोकसंख्या अंदाजे २७ लाखांवर गेली आहे. त्यामुळे घरांची मागणीही वाढत आहे. वाढती घरांची आवश्यकता पाहता शासनाने गृहप्रकल्प, वैयक्तिक घरांचा प्लॅन सॅक्शन व मान्यता देण्याची प्रक्रिया ही सुरळीत व सर्व सामान्यांना परवडेल अशी करावी. शासनाच्या अवघड, किचकट नियमावली व विलंबित प्रक्रियेमुळे नागरिक मान्यता न घेताच बांधकाम करुन घेतात. पुढे अशाच बांधकामांवरती अतिरिक्त मजले चढून अनाधिकृत बांधकामांचे जाळे वाढत जाते. परिणामी, शहराच्या विद्रुपीकरणात भर पडत आहे. अनाधिकृत बांधकामांमधील पार्किंगच्या अभावामुळे वाहने रस्त्यावर लागतात. यातूनच पुढे वाद होतात. वाहनांची तोडफोड अशा घटना अनधिकृत बांधकामांशीच निगडीत आहेत.

२०२१ च्या गटवारीनुसार ठरविण्यात आलेल्या ५ टक्के ओपन अमेनिटी स्पेसचा नियम हा छोट्या बांधकाम व्यावसायिकांना अतिशय मारक आणि त्रासदायक आहे. त्याचा फेरविचार करावा. छोटे बांधकाम व्यावसायिक ३ ते ४ गुठ्यांत १२-१५ फ्लॅटचे प्रकल्प राबवतात. सर्वसामान्यांना परवडेल अशा माफक किंमतीमध्ये शहरातील गरीब व मध्यम वर्गाला घर उपलब्ध करुन देतात. छोट्या प्रकल्पांमुळे शहराच्या नियोजनात व सौंदर्यात भर पडते. अनधिकृत बांधकामांना सुद्धा आपोआप लगाम बसतो. यासोबतच महापालिकेचे कर संकलन सुद्धा सुरळीतपणे आश्वासत होते.

२०२१ च्या नियमांसारख्या जाचक अटींमुळे सरकारला छोट्या बांधकाम व्यावसायिकांना संपवायचे आहे का?, असा प्रश्न पडतो. सध्याचे सरकार नियम हे फक्त मोठ्या बांधकाम व्यावसायिकांनाच प्रोत्साहन आणि त्यांचे समर्थन करणारे आहेत. त्याचा फेरविचार करावा, अशी मागणी केली आहे.

### बांधकाम व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान

» बांधकाम व्यावसायिकांना रेरा नोंदणी करताना कमीत कमी २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागत आहे. प्रकल्पाची नोंदणी कामाच्या सुरुवातीलाच करत असताना सुद्धा विनाकारण होणारा विलंब हा सर्व बांधकाम व्यावसायिकांसाठी डोके दुःखी झालेला विषय आहे. नियमांप्रमाणे रेरा नोंदणीच्या आधी प्रकल्पाचे (साईट) पब्लिक लॉंचिंग, सदनिकांचे (फ्लॅट) बुकिंग घेणे, जाहिरात करणे याला परवानगी नाही. रेरा नोंदणी नसेल तर बॅंका सुद्धा त्या गृहनिर्माण प्रकल्पांना हौसिंग लोन करत नाहीत. साहजिकच यामुळे बांधकाम व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होते.

### घर मान्यता प्रक्रिया सोपी करा...

» रेराचे मुख्य कार्यालय मुंबईत असून तेथे संपर्क साधता येत नाही. लीगल (कायदेशीर), टेक्निकल (तांत्रिक) आणि आर्थिक (फायनान्स) अशा तीन टप्प्यांमध्ये हे नोंदणीचे काम चालते. महारेराचे नंबर सातत्याने व्यस्त (बिझी) असतात. नीट संपर्क करता येत नाही. परिणामी, नोंदणी मधील त्रूटी जाणून घेता येत नाही. त्यामुळे विलंबात भर पडत आहे. काही जणांचे नोंदणी अर्ज ६ महिन्यापासून प्रलंबित आहेत. मार्गदर्शन, उपाय, रेराकडून सुचविले जात नाहीत. त्यामुळे गृहनिर्माण प्रकल्प, वैयक्तिक घर मान्यता ही प्रक्रिया सरळसोपी करण्याची मागणीही निवेदनातून केली आहे.

---

# ‘ओबीसी’ विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा मार्ग मोकळा!

### राज्यभरातील विद्यार्थ्यांना दिलासा : खासदार श्रीरंग बारणे यांचा यशस्वी पाठपुरावा

।पिंपरी ।

पनवेल मधील पिल्लेज महाविद्यालयातील 60 ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाने नवीन विषयांचा समावेश करत सुधारित आदेश काढले आहेत. यासाठी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी यशस्वी पाठपुरावा केला. त्यांच्या सततच्या पाठपुराव्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ओबीसी विभागाने हा आदेश काढला. याचा राज्यभरातील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे.



ओबीसी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क किंवा शिष्यवृत्तीचा लाभ मिळू शकणाऱ्या 64 अभ्यासक्रमांची यादी शासन निर्णयाने जाहीर करण्यात आली होती.

"इलेक्ट्रॉनिक अँड कम्प्युटर सायन्स" या विषयाकरता मिळणा-या शिष्यवृत्तीसाठी शासकीय अध्यादेशात नाव चुकीचे किंवा छापलेच नसल्याने विद्यार्थ्यांना मिळाली नव्हती. सुधारित शासन निर्णय आल्यानंतर आता पनवेलच नव्हे तर राज्यभरातील ओबीसींना या विशिष्ट विषयाकरता मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचा मार्ग मोकळा झाला असल्याचे खासदार बारणे म्हणाले.

### खासदार बारणे यांचे मानले आभार...

» विद्यार्थी व पालकांनी महानगरप्रमुख माजी नगरसेवक अॅड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांना हा विषय सांगितला. सोमण यांनी पुढाकार घेऊन मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांना या विषयाबद्दल माहिती दिली. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन खासदार बारणे यांनी त्वरित विषयाचा पाठपुरावा सुरू केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अंतिम आदेशाने अखेरीस आता हा शासन निर्णय दुरुस्त करून पुन्हा प्रसिद्ध करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा मार्ग मोकळा झाला. विद्यार्थी व पालक यांना प्रचंड मोठा दिलासा मिळाला. पालकांनी शासनाचे आभार मानण्यासाठी वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# मावळसह लोणावळ्यात कडकडीत बंद!

## आंदोलकांनी रास्ता रोको केल्याचा प्रकार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मराठा आंदोलकांवर जालन्यात पोलिसांकडून झालेल्या लाठीमार प्रकरणाचा निषेध नोंदविण्यासाठी लोणावळासह मावळ तालुक्यात सोमवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. तर, खेड तालुक्यात आळंदी मरकल रस्त्यावर आंदोलकांनी रस्त्यावर वाहनांचे टायर जाळ रास्ता रोको केल्याचा प्रकार घडला.**



दोन दिवसांपूर्वी मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी जालन्यात आंदोलन सुरू असताना पोलिसांकडून आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाचा निषेध नोंदविण्यासाठी व मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी लोणावळा शहर, कामशेत, वडगाव, तळेगाव, देहूरोड, पवनानगर या भागातील अत्यावश्यक सेवा व शाळा वगळता सर्व दुकाने, हॉटेल, रिक्षा, टॅक्सी, कंपन्या, भाजी मंडई असे सर्व व्यवहार सोमवारी बंद ठेवण्यात आले. तसेच शाळा महाविद्यालय यांना सुट्टी जाहीर करण्यात आली. मावळ तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या या आंदोलनाला सर्वांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला. मावळात या वेळी प्रथमच शहर व ग्रामीण भाग पूर्णपणे बंदमध्ये सहभागी झाला होता. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, याकरिता विविध समाजाचे नागरिक व नेते विभागवार निषेध मोर्चात सहभागी झाले होते. लोणावळ्यात छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व मराठा समाज व इतर सर्व समाजाचे नागरिक, सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी, रिक्षा व टॅक्सी चालक-मालक एकत्र जमले होते. याठिकाणी सर्व मान्यवरांनी महाराष्ट्र शासनाचा व पोलीस प्रशासनाचा निषेध नोंदविला. मुख्य म्हणजे मोठ्या संख्येने नागरिक या आंदोलनात सहभागी झाले. काही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मराठा समाजाने आजवर अनेक मूक मोर्चे काढत आरक्षणाची मागणी केली. जालन्यातदेखील शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू होते. मात्र या आंदोलनाच्या दरम्यान पोलिसांनी लाठचार्ज करीत आंदोलन मोडण्याचा प्रयत्न केला. समाजाचा अंत पाहण्याचा प्रयत्न करू नका, समाजाला तात्काळ आरक्षण द्या. पोलिसांना लाठीचार्ज कोणी करायला लावला, हे सर्व महाराष्ट्राला माहीत आहे. समाज पेटून उठला, तर महाराष्ट्रात भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते., याची दखल शासनाने घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

### पोलिसांकडून जागोजागी चोख बंदोबस्त

लोणावळ्यात छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व मराठा समाज व इतर सर्व समाजाचे नागरिक, सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, व्यापारी, रिक्षा व टॅक्सी चालक-मालक एकत्र जमले होते. याठिकाणी सर्व मान्यवरांनी महाराष्ट्र शासनाचा व पोलीस प्रशासनाचा निषेध नोंदविला. मुख्य म्हणजे मोठ्या संख्येने नागरिक या आंदोलनात सहभागी झाले. काही अनुचित प्रकार घडू नये, याकरिता पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# मिरवणुकीसाठी ढोलताशा महासंघांची पथकांना आचारसंहिता

## गणेश विसर्जन मिरवणूकीत आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास पुनर्विचार केला जाईल

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**गणेश विसर्जन मिरवणुकीचा विलंब टाळण्यासाठी ढोलताशा पथकांकडून केवळ बेलबाग चौक, उंबऱ्या गणपती चौक आणि टिळक चौक या तीन चौकातच जास्तीत जास्त आठ ते दहा मिनिटांपर्यंत वादनाचे खेळ सादर केले जाणार आहेत, उर्वरित चौकातून ही पथके वादन करतानाच मार्गस्थ होणार आहेत.**



याशिवाय पथकांमध्ये पन्नास ढोल, पंधरा ताशे व ध्वजपथकासह एकूण दीडशे ते दोनशे वादकांचा सहभाग राहणार असून, प्रत्येक वादकाच्या गळ्यात ओळखपत्र असेल, तसेच कोणतेही पथक टोलवादन करणार नाही, अशी आचारसंहिता ढोलताशा महासंघाने पथकांना घालून दिली आहे. या आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या पथकांना पुढील वर्षी नोंदणी देण्याबाबत पुनर्विचार केला जाईल, असा इशारा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिला. 'गणेशोत्सवाचे सर्वांत मोठे आकर्षण असलेली विसर्जन मिरवणूक वेळेत संपावी, यासाठी सर्व ढोलताशा व ध्वजपथकांकडून गणेश मंडळे व पोलिसांना सहकार्य केले जाईल,' अशी भूमिका महासंघाचे अध्यक्ष पराग ठाकूर यांनी मांडली. संजय सातपुते, विलास शिगवण, ॲड. शिरीष थिटे, ओंकार कलढोणकर, संजय शिगवण आदी महासंघाचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. 'यंदाच्या गणेशोत्सवात १७० ढोलताशा पथकातील सुमारे २२ हजार वादक शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी होणार आहेत. लक्ष्मी रस्त्यासह केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता, कर्वे रस्ता आदी प्रमुख विसर्जन मार्गांवर प्रथमच पोलिसांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसोबतच्या बैठकीत ढोलताशा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनाही निमंत्रित केले होते. या बैठकीत ढोलताशा पथकांकडून तीनच चौकात जास्तीत जास्त आठ ते दहा मिनिटांपर्यंत वादनाचे खेळ सादर केला जाणार आहे. त्याला विलंब झाल्यास महासंघाच्या पदाधिकाऱ्यांकडून पथकांना पुढे जाण्याच्या सूचना केल्या जातील. गणेश मंडळे, प्रशासनासह महासंघाचे पदाधिकारी, स्वयंसेवक समन्वय राखण्यासाठी सहकार्य करतील,' असेही ठाकूर यांनी सांगितले.

### ढोलताशा वादनकलेला हवा खेळाचा दर्जा

**शहरात १६०, तर जिल्ह्यात २६६ बिगरशालेय ढोलताशा पथके आहेत. प्रत्येक पथकांत शंभर ते सहाशे सदस्यांचा समावेश आहे. या उपक्रमातून तरुणाईला विधायक दिशा मिळत असून, पथकांकडून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या वादनकलेला खेळाचा दर्जा देण्यासाठी केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांना निवेदन दिले आहे, असेही महासंघातर्फे सांगण्यात आले.**

### नागरिकांना त्रास होता कामा नये

**ढोलताशा पथकांच्या सरावांसाठी आतापर्यंत परवानगी घेतली जात नव्हती. पोलिस प्रशासनासोबत संपर्क समन्वयातूनच सराव केला जात होता. यंदा प्रथमच सरावाच्या परवानगीचा प्रश्न निर्माण झाला आहे. सरावासाठी मोकळ्या जागा मिळत नसल्याने अडचणी येत आहेत, तरीही नागरिकांना त्रास होऊ नये, अशी आमची भूमिका असून, त्यासाठी सरावाचा कालावधी दीड महिन्यापर्यंत कमी केला आहे, असे महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.**

# पुण्येश्वराजवळील बेकायदा मस्जिद पाडा!

## महेश लांडगे यांची भीमगर्जना : पुणे महापालिका प्रशासनाला 48 तासांची मुदत

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आम्ही हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराजांचे अनुयायी आहोत. आम्ही अयोध्येतील बाबरी मशीद पाडू शकतो. तर पुण्येश्वरला अतिक्रमणातून मुक्त करण्यासाठी तिथे उभारलेली अनधिकृत मशीद पाडूच शकतो, अशी भीमगर्जना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

पुणे हे शहराचे नाव ज्यावरून पडले ते पुण्येश्वर मंदिर आणि या मंदिराच्या जागेवरील बेकायदा मस्जिद हटवण्यासाठी सकल हिंदू समाज बांधव आणि विविध संघटनांच्या वतीने पुणे महापालिका भवनासमोर आज तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी भाजपाचे आमदार महेश लांडगे, नितेश राणे, पुणे भाजपाचे शहराध्यक्ष धीरज घाटे, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ, प्रखर हिंदुत्ववादी नेते डॉ. गजानन एकबोटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, पुण्यात श्री. पुण्येश्वर मंदिराजवळील अनधिकृत मस्जिदीचे बांधकाम ४८ तासांत हटवा... अन्यथा आम्ही हटवणार आहोत.

पुणे शहराला ज्या मंदिराच्या नावावरुन ओळखले जाते. तो इतिहास कायम ठेवण्यासाठी आम्ही आता लढा सुरू केला आहे. पुण्येश्वराला अतिक्रमणातून मुक्त केले पाहिजे. न्यायालयाने या बांधकामाला स्थगिती दिली आहे. पण, प्रशासन कारवाई करीत नाही. प्रशासनाने जी मुळमुळीत भूमिका घेतली आहे.




### कोण आला रे कोण आला...

» राज्याच्या विधानसभा सभागृहामध्ये समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्यासोबत आमदार महेश लांडगे यांची शब्दीक खडजंगी झाली होती. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांनी लांडगे यांचा प्रखर हिंदूत्ववादी नेतो म्हणून समर्थन केले होते. आज झालेल्या आंदोलनात आमदार लांडगे यांनी भाषणाला सुरूवात करण्यापूर्वी हिंदूत्ववादी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यामध्ये "कोण आला रे कोण आला... अबू आझमीचा बाप आला..." अशा प्रक्षोभक घोषणा देण्यात आल्या. आमदार लांडगे यांनी आक्रमकपणे भूमिका मांडली. पुण्याच्या कोंढवा, हडपसर भागात जर काही लोक घातक शस्त्र बाळगून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतील. तर आम्ही सुद्धा घरात घुसून मारल्याशिवाय गप्प बसणार नाही... अशा इशाराही आमदार लांडगे यांनी दिला. त्यामुळे पुण्यात हिंदूत्ववादी संघटना आक्रमक झाल्याचे पहायला मिळत आहे.

---

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संकल्प!

## आयुक्त शेखर सिंह : अशासकीय संस्थांना केले आवाहन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक वातावरणात साजरा करावा यासाठी शहरातील गणेशोत्सवामध्ये सेवा करणाऱ्या अशासकीय संस्था, एनजीओ, पर्यावरणप्रेमींनी सहभाग घ्यावा. या कार्यात महापालिका प्रशासनाकडून संस्थांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल असे आयुक्त शेखर सिंह म्हणाले. पर्यवरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी सामाजिक संस्थांनी नागरिकांना प्रयत्न करावेत, असेही ते म्हणाले.**

१९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत सर्वत्र मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा होणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात साजरा होणाऱ्या यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने तसेच क्षेत्रीय कार्यालयनिहाय आढावा घेण्यासाठी महानगरपालिका आणि पर्यावरण प्रेमी यांची बैठक महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील माजी महापौर मधुकर पवळे सभागृह येथे संपन्न झाली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजय खोराटे, उल्हास जगताप, उप आयुक्त रविकिरण घोडके, मिनीनाथ दंडवते, सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, बाबासाहेब गलबले, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, विशेष अधिकारी किरण गायकवाड, आरोग्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



गणेशोत्सव आनंदी वातावरणात पार पाडावा आयुक्त शेखर सिंह म्हणाले, गणेश मूर्ती संकलन करणारी वाहने सुस्थितीत असावीत, प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत गणेश मूर्ती संकलन केंद्रांची स्थापना करण्यात यावी, पर्यवरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी सामजिक संस्थांनी नागरिकांना प्रयत्न करावेत, महापालिका प्रशासनाने तात्काळ शहरातील गणेशोत्सव मिरवणुकीचे मार्ग तसेच सर्व विसर्जन घाट व्यवस्थित करावेत. तसेच विसर्जनाच्या ठिकाणी पुरेशा विद्युत प्रकाशाची व्यवस्था करावी, नदी घाटावर असणा-या कृत्रिम विसर्जन हौदांची डागडुजी करून आवश्यकतेप्रमाणे इतर ठिकाणी नव्याने कृत्रिम हौद तयार करावे, प्रभाग स्तरावर सार्वजनिक गणेश मंडळे, गृहनिर्माण संस्था, अशासकिय संस्था, पर्यावरणवादी संघटना यांच्याशी समन्वय साधून गणेशोत्सव आनंदी वातावरणात पार पाडावा, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले.

### आज मंडळ्यांच्या प्रतिनिधींशी बैठक...

**» पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या पदाधिकारी तसेच प्रतिनिधींची, महापालिकेचे आयुक्त, पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्त, विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी यांच्यासह गणेशोत्सव संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक उद्या मंगळवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी ग. दि. माडगुळकर नाट्यगृह येथे सायंकाळी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे, या बैठकीस शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.**

# दोघेही राजकीय सत्तेचे बळी ?




**देशात अन राज्यात कोणतेही आंदोलन घ्या,ते प्रत्येक आंदोलन हे ज्यांच्या विरोधात केलेले असते, ते नेहमी सुरक्षित असतात. आंदोलक आणि पोलीस या दोघांनाच एकमेकांच्या समोर यावे लागते. आंदोलन हे जणू आंदोलक आणि पोलीस यांच्या मध्येच असल्या सारखी परिस्थिती उदभवलेली असते.**

छोटे आंदोलन असेल तर ते जास्त धोकादायक ठरत नाही. परंतु मोठ्या आंदोलनाची दिशा ही नेहमी हिंसक बनण्याची जास्तच शक्यता सुरक्षा यंत्रणांनाही गृहीत धरावी लागत असते. जाळपोळ, दगडफेक असे घातक प्रकार होऊन बसतात. याचे दुष्परिणाम म्हणून सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीसोबतच मनुष्यहानी होते. यांमध्ये आंदोलकच नव्हे तर पोलीस सुद्धा जखमी होतात... सरकार मात्र निवांत राहते! आंदोलनाकडे विशेष लक्ष देण्याचे आदेश सरकार पोलिसांना कसे का देईना परंतु त्यांच्या आदेशाने मरण तर आंदोलक आणि पोलीसांचेच होते. जे सरकारला जमत नाही, ते पोलिसांच्या माध्यमातून करण्याचे काम सरकार करत असते.



अशावेळी पोलिसांना आदेशाची अंमलबजावणी करावी लागत असल्याने पोलीससुध्दा आंदोलकांना ‘सरकारच्याच बाजूचे’ वाटतात. कारण सत्तेचे राजकारण करणाऱ्या नेत्यांना जे करायचे असते ते तेच करतात. आंदोलकांना ‘उचलण्या’चे, त्यांचे आंदोलन चिरडण्याचे प्रकार पोलीसांच्याच हातून करविले जातात. त्यामुळे ‘सरकार हम से डरती है, पुलीस को आगे करती है...’ हा नारा अनेक आंदोलनांमध्ये नेहमी ऐकू येतो. अलीकडल्या काळात तर, तो खरा वाटावा असे प्रकार अनेकदा घडले आहेत... ‘डाऊ केमिकल्स’च्या विरोधात आंदोलन करणाऱ्या मावळ तालुक्यातील आंदोलकांना पोलिसांनी लाठीमार आणि हवेत गोळीबार करून पिटाळल्याची घटना दहा वर्षांपूर्वीची... पण गेल्या तीनचार वर्षांतल्या घटना आठवून पाहा. नागरिकत्व सुधारणा कायद्यांच्या विरोधात शाहीन बाग आंदोलन शांततामय मार्गाने चालले असतानाच्या काळात कुणी एक तरुण नोएडाजवळच्या जेवर गावातून बंदूक घेऊन येतो, पोलिसांचे कडे तोडून जामिया विद्यापीठात धरणे धरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दिशेने गोळीबार करतो आणि या देशात केवळ विशिष्ट धर्माचे लोकच राहू शकतात, अशा घोषणा देतो, तोवर पोलीस पाहात राहातात आणि नंतर त्या तरुणाला ताब्यात घेतले जाते, ही घटना ३० जानेवारी २०२० रोजी घडलेली.

राजधानी दिल्लीतच महिला कुस्तीपटूंचे आंदोलन सुरू असताना जंतर मंतर भागातील या आंदोलकांचे तंबू प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी कसे उद्ध्वस्त करण्यात आले आणि आंदोलक महिलांना पोलिसांनी कसे उचलून गाडीत कोंबले हेही भारतीयांनी पाहिले आहे. त्याआधी दिल्लीच्या सीमेवरील किसान आंदोलनाच्या वेळी रस्त्यावर खिळे ठोकून ठेवणाऱ्या सुरक्षा यंत्रणा नेमक्या कोणाविरुद्ध कोणाची सुरक्षा करत होत्या, याचीही चर्चा झालेली आहे. जालना येथे नुकतेच मराठा आंदोलकांवर पोलीसांकडून लाठीचार्ज करण्यात आला. अत्यंत निषेधार्ह अशी घटना घडली. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे या प्रमुख मागणीसाठी आंदोलन स्थळावर शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू होते. असं काय घडलं अन पोलिसांना लाठीचार्ज का करावा लागला? आंदोलक चुकले? पोलिसांकडून आक्रमण झाले? की सरकारनेच पोलीसांना असे काही करण्यास भाग पाडले? हे प्रश्न विचारणे आणि विनाविलंब त्यांची उत्तरे शोधणे हे काम तज्ज्ञांच्या चौकशी समितीकडून होईलही, परंतु आंदोलकांवर ज्या पध्दतीने अमानुष असा लाठीमार करण्यात आला त्यामुळे अनेक आंदोलक जखमी झाले आहेत. यांमध्ये महिलासुद्धा जखमी झाल्याने राज्यभर संतापाची लाट पाहायला मिळाली. मराठा आरक्षणाचा मुद्दा महाराष्ट्रात ठिकठिकाणी निघालेल्या ‘मूक मोर्चां’मुळे तातडीचा ठरला होता.

आजवर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी झालेली सर्वच आंदोलने शांततामय आहेत. मराठा क्रांति मोर्चाचे आंदोलन हे पक्षविरहित व राजकीय नेतृत्वविरहित असल्याने जे प्रश्न सत्तेला विचारले जात आहेत. तेच प्रश्न विरोधी पक्षीयांनाही विचारण्याची धमक मराठा समाज दाखवत आहे. मराठा आरक्षणचा मुद्दा यापूर्वीच मिटविला असता तर आज ही लाठ्या खायची वेळ कदाचित मराठा समाजातील आंदोलकांवर आली नसती. त्यामुळेच जालना जिल्ह्यातील आंदोलनाशी पोलीस असे का वागले, हे कोडे आहे.

## संपादकीय »

# एक एके एक..!

***विद्यमान सत्ताधीशांसमोर असे कोणते संकट आहे की जे टाळण्यासाठी ‘एक देश एक निवडणूक’चा मुद्दा निवडणुकीच्या जेमतेम सहा-आठ महिने आधी काढावा लागतो?***

विरोधकांस त्यांचा पैस सोडाच; पण वृत्तमथळय़ांपासूनसुद्धा कसे वंचित ठेवावे हे विद्यमान केंद्र सरकारकडून शिकण्यासारखे आहे. मुंबईत नव्या ‘इंडिया’ आघाडीच्या तिसऱ्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर विशेष संसद अधिवेशनाची घोषणा करणे आणि त्यात ‘एक देश एक निवडणूक’ संकल्पनेचे पिल्लू सोडणे हा याचाच एक धडा.

वास्तविक केंद्रीय सत्ताधारी आणि राज्याराज्यांतील त्यांची नवी आयात पिलावळ ‘इंडिया’ आघाडी किती अर्थहीन हे सांगण्यासाठी जिवाचे रान करीत असताना परत त्यांना निष्प्रभ करण्यासाठी इतका आटापिटा सत्ताधीशांना का करावा लागावा हे अनाकलनीय ठरते. विरोधकांच्या बैठकीची कार्यक्रम पत्रिका पळवून नेली म्हणजे विरोध नाहीसा होईल असा काहीसा सत्ताधाऱ्यांचा विचार त्यातून दिसतो.

**संसद अधिवेशनाच्या काळात होणाऱ्या भाजपच्या संसदीय पक्षाच्या बैठका, वेगवेगळय़ा राज्यांतील पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोरील मार्गदर्शनात्मक व्याख्याने, अगदी अलीकडे लाल किल्ल्यावरील प्रदीर्घ भाषण अशा विविध जाहीर प्रकटीकरणातून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील लोकांना अत्यंत सकारात्मक संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न केलेला दिसला. मोदींनी अमृतकाळाचे महत्त्व सांगितले.**

# भाजपला ‘इंडिया’ खुपू लागली ?

२०४७ मध्ये स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षांपर्यंत भारत विकसित देश बनलेला असेल इतकेच नव्हे तर, जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झालेला असेल असे सांगितले. केंद्राच्या अखंड नवनव्या योजनांच्या लाभार्थीमध्ये कशी वाढ होत आहे, गरिबीतून लोकांना मुक्ती कशी मिळू लागली आहे, याची माहिती दिली. पक्षाचे सर्वोच्च नेते यशोगाथांची इतकी मोठी यादी देतात, तेव्हा पक्षामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, हा पक्ष स्वबळावर लोकसभेची निवडणूक जिंकू शकेल असा विश्वास लोकांनाही वाटू लागतो. मग, कोणालाही प्रश्न पडेल की, असे असेल तर मग भाजपला धक्कातंत्राची गरज काय? बहुधा विरोधकांच्या ‘इंडिया’ने भाजपला मुळापासून हादरवून टाकलेले असावे. भाजपेतर विरोधकांच्या महाआघाडीची पहिली बैठक जूनमध्ये पाटण्यात झाली, त्यानंतर दुसरी जुलैमध्ये बंगळूरुत झाली. पहिल्या दोनमध्ये



ऐक्याची चाचपणी सुरू होती. दोन दिवसांपूर्वी मुंबईत झालेली तिसरी बैठक मात्र एकजुटीच्या पलीकडे जात जागावाटपासारख्या मतभेद चव्हाटय़ावर आणणाऱ्या विषयांवर झाली. त्यातून विसंगती दिसण्यापेक्षाही ‘इंडिया’ची महाआघाडी भाजपविरोधात लढायला सज्ज झाल्याचा स्पष्ट संदेश दिला गेला. ‘इंडिया’तील घटक पक्षांवर घराणेशाहीचे, भ्रष्टाचाराचे कितीही आरोप झाले तरी, लोकसभेच्या ५४५ पैकी ४७० जागांवर भाजपविरोधात ‘इंडिया’कडून एकास एक उमेदवार दिला जाईल; मग हे आरोप भाजपच्या काही कामाचे उरणार नाहीत. त्याऐवजी मतदारसंघनिहाय आकडय़ाचे समीकरण मांडावे लागेल. या मैदानी खेळात भाजपच्या जागांची २४०-२५० पर्यंत घसरण झाली तर या अपयशाची जबाबदारी पक्षाच्या सर्वोच्च नेत्याला स्वीकारावी लागेल. या शक्याशक्यतेचा अंदाज घेण्याचा प्रयत्न भाजपने ‘इंडिया’ची मुंबईची बैठक सुरू असताना घेतलेला दिसला. बैठकीच्या पहिल्या दिवशी संसदेच्या विशेष अधिवेशनाची घोषणा केली गेली. दुसऱ्या दिवशी ‘एक देश, एक निवडणूक’ या संसदीय लोकशाहीला अध्यक्षीय पद्धतीकडे नेणाऱ्या सूत्राच्या अभ्यासासाठी समिती नेमली गेली. या दोन्ही घोषणांतून ‘इंडिया’तील घटक पक्षांमध्ये गोंधळ उडवून देण्याचा इरादा असावा. ‘इंडिया’ आता बोचू लागली असून तिने भाजपच्या मनाचा ठाव घेतला असे दिसते. संसदेच्या विशेष अधिवेशनामागील हेतूबाबत केंद्राने इतकी गुप्तता बाळगली आहे की, वाजपेयीकाळातील पोखरण अणुचाचणीच्या वेळीदेखील इतकी गोपनीयता राखली गेली नसेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ते मंत्रालयाच्या आजबाजूला फिरकण्याच्या कुवतीचे नाहीत!

## » उद्धव ठाकरेंचा फडणवीस पवार शिंदेवर घणाघात

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी या गावात झालेल्या मराठा आंदोलकांवरील अमानुष लाठीहल्ल्याची घटना. यावरून राज्यातील राजकारण चांगलच तापलं आहे. दरम्यान, राजकीय मंडळी एकमेकांवर फैरी झाडत आहेत. अशातच 'सुप्रीम कोर्टात आरक्षण टिकलं नाही त्यानंतर उद्धव ठाकरे एक वर्ष मुख्यमंत्री होते. त्यांनी वटहुकून का नाही काढला, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

त्यांच्या या वक्तव्याबाबत उद्धव ठाकरे यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावर उद्धव ठाकरे आधी हसले. त्यानंतर त्यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी फडणवीस यांचं ज्ञान तोकडं आहे, ते तर मंत्रालयाच्या आजूबाजूला फिरण्याच्या कुवतीचे देखील नाहीत, अशा खोचक शब्दात त्यांच्यावर टीका केली. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठा आरक्षणावरुन ठाकरे सरकारवर केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया दिली. तसेच त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मराठा आरक्षण उपसमितीची बैठक पार पडली. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी एकत्र पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. त्यावर ठाकरेंनी पत्रकार परिषद घेऊन प्रतिक्रिया दिली. पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांचं ज्ञान एवढं तोकडं असेल असं मला वाटलं नव्हतं. वटहुकूम काढण्याचा अधिकार संसदेला दिलेला आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय दिल्ली सरकारने का फिरवला नाही? तो केंद्राने फिरवला. हा अधिकार केंद्राचा आहे. देवेंद्र फडणवीस यांना मी थोडंतरी हुशार समजत होतो, पण आता तर असं वाटतं की, ते बिलकूल मंत्रालयाच्या आजूबाजूला फिरकण्याचेही कुवतीचे नाहीत, अशी जहरी टीका ठाकरे यांनी केली. ठाकरे म्हणाले की, वटहुकूम सुप्रीम कोर्टाच्या निकालाविरुद्ध राज्य सरकार काढायला लागले तर त्यांनी घटनेचा अभ्यास केलेलाच नाही. म्हणजे घटना बदलण्याचं काम जे काही करणार असं आम्ही म्हणत आहोत त्याचीच ही सुरुवात आहे. सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर त्याच्याविरोधात दिल्लीचा अधिकार केंद्र सरकारने आपल्या ताब्यात घेतला तो वटहुकूम किंवा कायदा संसदेत करायला हवा. तसंच सर्वोच्च न्यायालयाचा निकाल तुम्हाला मान्य नसेल तर तो निर्णय फिरवण्याचा अधिकार संसदेला आहे. त्यामुळे खास अधिवेशन घेऊन तो निकाल बदलून दाखवा, असे आव्हान ठाकरे यांनी केले. एक फुल दोन हाफ तिघांनी राजीनामा दिला पाहिजे. कारण हा दोष त्यांच्या टीमचा आहे. आजपणे एवढं निर्घृणपणे सरकार वागलेलं माझ्या निदर्शनास आलं नव्हतं. कुणी रस्त्यावर आले तर आम्ही डोकी फोडू, माता-बघिणी बघणर नाही, वय बघणार नाही, घरात घुसून मारु, हाच संकेत त्यांनी दिला आहे. याचा प्रत्यय आपल्याला बारसूत आला होता. तिथे महिला न पाहता लाठीमार केला होता. जे सरकार स्वत:ला हिंदुत्ववादी मानतं ते वारकऱ्यांवर लाठीमार करतं हे मला पटत नाही. त्यांनी आतासुद्धा जो निर्घृणपणे आत्याचार केलाय त्याची जबाबदारी कोण घेणार? कारण हे सांगणार पोलिसांनी केला, पोलीस म्हणार लाठ्यांनी केलं.



### डोकी फोडली त्याचं श्रेय यांनी घ्यावं

» अजित पवार यांना मी समजदार समजत होतो. माझं काही चुकलं तेव्हा हे विकेट किपर म्हणून काम करत होते? मी त्यावेळेला अनेक जणांशी चर्चा करत होतो. कुठेही वकील बदलले नव्हते. महत्त्वाचा मुद्दा काय आहे, आता जे काही डोकं फोडली आहेत, मला ते जर अपश्रेय देणार असाल तर आता जे काही डोकी फोडली त्याचं श्रेय या सर्वांनी टीमवर्क म्हणून स्वीकारलं पाहिजे.

# मराठा समाजाच्या पाठीशी आम्ही ठामपणे उभे!

## » आंदोलनांच्या आडून शांतता बिघडवण्याचा प्रयत्न : मुख्यमंत्री

।मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे ते टिकले पाहिजे ही भूमिका आमची आहे. आम्ही टास्क फोर्सची स्थापना केली आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका सरकारची आहे. मराठा समाज मागासलेला आहे आणि ते सिद्ध व्हायला हवे. सरकार पूर्णपणे मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या बाजूने आहे.**

ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना जे फायदे मिळतात ते देत आहोत. आंदोलनांच्या आडून शांतता बिघडवण्याचा प्रयत्न होत आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला कुणबीचा दाखला देण्याचा विचार करण्यासंबंधी एक समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे. ही समिती एका महिन्याभरात आपला अहवाल सादर करेल. त्यानंतर सरकार योग्य तो निर्णय घेईल, असे ते म्हणालेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले चुकीचे गुन्हे मागे घेण्याचीही घोषणा केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मराठा समाजाची आंदोलन यापूर्वी देखील झाले. जवळपास ५८ मोर्चे महाराष्ट्रात महाराष्ट्रात निघाले. मराठा समाज शिस्तबद्ध आहे. आंदोलनाच्या अडून काही लोक जे महाराष्ट्रात राजकारण करू इच्छितात. तब्येतीची काळजी घेण्याची गरज आहे. मराठा समाजाच्या बाबतीत गांभीर्याने काम करतो. दिवसभर रात्र त्यावर काम करण्याचे काम केले. काही लोक ज्यामध्ये ज्या प्रकारचे भाषण करतात. ज्या पद्धतीने मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. ही भूमिका घेतली. तेव्हा काही बाब सुप्रीम कोर्टाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी का कमी पडले. मात्र, आमचे सरकार त्यासाठी काम करत आहे. त्यात पुरावे आहेत. त्या कशा आणता येतील त्यावर काम सुरू आहे. अधिसंख्यापदाच्या बाबतीत निर्णय घेतला गेला नाही. ३७०० अधिसंख्या पदाचे भवितव्याचे पहिला निर्णय घेतला. त्यानंतर अनेक निर्णय घेतले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळांचे बजेट वाढले आहे. परदेशी शिकण्यासाठी जाणाऱ्या मुलांना त्यासाठी . आम्ही कुणाची फसवणूक करायची नाही.



### काही लोक पुरावे सादर करण्यात अपयशी

» काही लोक ज्यामध्ये ज्या प्रकारचे भाषण करतात. ज्या पद्धतीने मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. ही भूमिका घेतली. तेव्हा काही बाब सुप्रीम कोर्टाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी का कमी पडले. मात्र, आमचे सरकार त्यासाठी काम करत आहे. त्यात पुरावे आहेत. त्या कशा आणता येतील त्यावर काम सुरू आहे.

# राहुल गांधीची ना लाँचिंग ना लँडिंग!

## » गेहलोत ड्रायव्हिंग सीटवर, एक्सलेटर दुसऱ्याच्या हातात

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चांद्रयानचे प्रक्षेपण आणि लँडिंग यशस्वी झाले, परंतु राहुलयानाची 20 वर्षांपासून ना लाँचिंग होऊ शकली ना लँडिंग. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलच्या अहवालानुसार राजस्थान भ्रष्टाचाराच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर आहे. राजस्थानमध्ये पेपर फुटत आहेत. सीएम गेहलोत ज्या कारमध्ये बसले आहेत, त्या गाडीचा क्लच दुसरा कोणीतरी दाबत आहे. दुसरा कोणीतरी एक्सलेटर दाबत आहे.**

रामदेवरा येथे भाजपच्या तिसऱ्या परिवर्तन संकल्प यात्रेला हिरवा झेंडा दाखविण्यापूर्वी राजनाथ उपस्थितांना संबोधित करत होते. ही यात्रा 20 दिवसांत जोधपूर विभागातील 51 विधानसभा मतदारसंघांना भेट देणार आहे. या भूमीवर 5-5 अणुचाचण्या झाल्या आहेत. या भूमीला अनेक अर्थाने अभिमान आहे. 1998 मध्ये अणुचाचण्या करून भारताने झेप घेतली. चांद्रयान-3 ने 23 ऑगस्ट रोजी चंद्रावर उतरून अशीच उडी घेतली होती. भारत चंद्रावर पोहोचला आहे. आता 15 लाख किलोमीटरचे अंतर कापल्यानंतर आपण आदित्य-L1 वरून सूर्याकडे जात आहोत. हॉलिवूड चित्रपटांपेक्षा कमी बजेटमध्ये आमच्या शास्त्रज्ञांनी हे काम केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हटवण्यासाठी 28 पक्ष एकत्र आले आहेत. नाव मोठे आणि काम छोटे अशी या महाआघाडीची परिस्थिती आहे. त्यांच्या युतीचे लोक सनातन धर्माला धक्का देत आहेत. काँग्रेस गप्प आहे. यावर राहुल, प्रियांका आणि सोनिया गांधी काहीच का बोलत नाहीत? सनातन धर्माला ना जन्म आहे ना अंत आहे. 2014 मध्ये आपली अर्थव्यवस्था 10 व्या स्थानावर होती. आता 9 वर्षांनंतर भारत अर्थव्यवस्थेत पाचव्या स्थानावर आला आहे. 2027 पर्यंत भारताची अर्थव्यवस्था पहिल्या 3 मध्ये असेल. 2014 मध्ये आमचे



### नाव मोठे आणि काम छोटे

» पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हटवण्यासाठी 28 पक्ष एकत्र आले आहेत. नाव मोठे आणि काम छोटे अशी या महाआघाडीची परिस्थिती आहे. त्यांच्या युतीचे लोक सनातन धर्माला धक्का देत आहेत. काँग्रेस गप्प आहे. यावर राहुल, प्रियांका आणि सोनिया गांधी काहीच का बोलत नाहीत? सनातन धर्माला ना जन्म आहे ना अंत आहे.

सरकार आले तेव्हा 18 हजार गावांत वीज नव्हती. आमच्या सरकारने दीड वर्षात वीज देण्याचे काम केले आहे. जनधन खात्यातून पैसे थेट खात्यात जातात, त्यामुळे भ्रष्टाचाराचे मार्ग बंद झाले आहेत. दिल्लीतून येणारा सगळा पैसा लोकांच्या हातात जातो. गरीब कल्याण हाच आमचा मंत्र आणि ध्येय आहे. भारत आता कमकुवत नसून एक मजबूत देश आहे. यापूर्वी हे प्रकरण आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर ऐकू येत नव्हते, पण आज भारत बोलतो तेव्हा सारे जग कान उघडे ठेवून ऐकते. जगभरात भारताची प्रतिष्ठा वाढली आहे. कोरोनाच्या काळात आपल्या शास्त्रज्ञांनी लस बनवली. आज लसींच्या बाबतीत भारताची परिस्थिती अशी झाली आहे की, भारताने जगातील 100 देशांमध्ये लस पाठवल्या आहेत. 56 महिन्यांत 10 लाख केसेस झाल्या आहेत. राजस्थानमध्ये 7650 निष्पाप लोकांची हत्या करण्यात आली आहे. राजस्थानसारखी परिस्थिती कुठेही नाही. 2 लाखांपैकी 31 हजार प्रकरणे बलात्काराची आहेत. लहान मुलींवर बलात्कार झाला आहे. जोधपूरमध्ये संपूर्ण कुटुंबाची हत्या करण्यात आली आहे. उदयपूरमध्ये घडलेली घटनाही सर्वांना आठवते. हा प्रवास म्हणजे परिवर्तनाचा बिगुल आहे. काँग्रेस-भाजपच्या राजवटीत पूर्वी काय वातावरण होते आणि आता काय वातावरण आहे, याचे जनतेने स्वतःहून आकलन करावे. माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण जगात आपल्या देशाचा गौरव केला आहे. देशातील गरिबी कमी झाली आहे. लोकांच्या जीवनात समृद्धी आली आहे. राम मंदिर बांधण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. राजस्थानमध्ये 2018 मध्ये काँग्रेस फसवणूक करून सरकारमध्ये आली. हाताच्या बोटावर मोजण्याइतके, त्यांनी 10 दिवसांत कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले, परंतु ते केले नाही. आज राजस्थानमध्ये कायदा आणि सरकार असे काहीही नाही. खून, टोळीयुद्ध, सामूहिक बलात्कार, लुटमारीच्या घटना रोज घडत आहेत. महिलांवरील अत्याचारात राजस्थान पहिल्या क्रमांकावर आहे. हे सरकार मूकबधिर आहे. केंद्रीय जलशक्ती मंत्री गजेंद्र सिंह म्हणाले की, काँग्रेस पक्षाचे लोक कधी रामाचे अस्तित्व नाकारतात, कधी रामसेतूचे अस्तित्व नाकारतात, कधी राम मंदिराच्या उभारणीत अडथळे निर्माण करतात. 'भारत तेरे टुकडे होंगे'चा नारा देणाऱ्या कन्हैया कुमारला त्यांनी स्टार प्रचारक बनवले आहे.

# काही लोकांना देश मजबूर दाखवायचा आहे !

## » देशाच्या प्रतिष्ठेवर कुणी आक्षेप घ्यावा आम्ही सहन करावे?: जगदीप धनखड

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आज भारत मजबूत स्थितीत असल्याचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटले आहे. काही लोकांना सशक्त भारत लाचार का दाखवायचा आहे हे कळत नाही. मजबुरीबद्दल बोलणाऱ्यांना उत्तर देणे हे तुम्हा सर्वांचे काम आहे. राष्ट्रीय उभारणीत महिलांचा सहभाग या विषयावर महाराणी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना संबोधित करताना उपराष्ट्रपती बोलत होते.**

त्यांनी विद्यार्थिनींना सांगितले - तुम्ही टीकाकार बना. हुशारीने वागा, शब्द पाळा. शेवटी निर्णय देशाच्या बाजूनेच हवा. उपराष्ट्रपती म्हणाले- कोणी आपल्या देशाच्या आणि आपल्या संस्थांच्या प्रतिष्ठेला काळिमा फासणार असेल तर आम्ही ते सहन करू. ही आपली संस्कृती नाही. पुढे जाऊन पुढच्या पायावर खेळले पाहिजे. अशा शक्तींना आपण नाकारले पाहिजे. स्त्रीशक्ती मी जवळून पाहिली आहे. त्या शक्तीचे बारकाईने परीक्षण केले आहे. मी तीन वर्षे पश्चिम बंगालचा राज्यपाल होतो. त्यात ती वेळही जोडली जाते. इथल्या मुख्यमंत्र्यांना जादूगारही म्हणतात. विधानसभेच्या कार्यक्रमात त्यांनी मला विचारले होते की, तुम्ही अशी कोणती जादू केली की ममता बॅनर्जीनीही तुम्हाला उपराष्ट्रपती होण्यास विरोध केला नाही. मी त्यांना सांगितले की हे



एक रहस्य आहे. पण मी महाराणी कॉलेजमध्ये येऊन हे गुपित सांगेन. स्त्री शक्तीबद्दल मी एवढेच म्हणेन की माझ्यात एकच ताकद आहे. माझी आजी, माझी आजी, माझी आई आणि माझी पत्नी. चौघीही अत्यंत हुशार आणि कणखर आहेत. मला त्यांची गरज असताना त्या माझ्या मागे खडकासारख्या उभ्या राहिल्या. पाच दशकांत मोठे चढ-उतार आले. त्या माझ्यासोबत असणं मी भाग्यवान होतो. धनखड यांनीही आपल्या भाषणात विद्यार्थिनींना गुरुमंत्र दिला. ते विद्यार्थिनींना म्हणाले - मी आज तुम्हाला एक किंवा दोन गुरु मंत्र देणार आहे. जीवनात नेहमी त्याचे अनुसरण करा. सर्वप्रथम, कधीही टेन्शन ठेवू नका. तणावामुळे काहीही होणार नाही. लोक म्हणतात की आकाश कोसळेल. अयशस्वी होण्यास घाबरू नका. अपयशाशिवाय आजपर्यंत कोणताही विकास झालेला नाही. कोणीही पहिल्यांदा चंद्रावर पोहोचले नाही. महाराणी कॉलेज येथून दुपारी साडेचार वाजता अध्यक्ष धनखर थेट दिग्गी कल्याण रायजी मंदिराकडे रवाना झाले. येथे ते दिग्गी कल्याण मंदिराला भेट देतील. येथून उपाध्यक्ष जगदीप धनखर कोटाला रवाना होतील. कोटा येथे उपराष्ट्रपती मंगळवारी कर्मयोगी गौरव सन्मान सोहळ्यात सहभागी होतील. सत्कार समारंभात केंद्र, राज्य सरकार आणि इतर सरकारी संस्थांमधून निवृत्त झालेल्या कर्मयोगींचा गौरव करण्यात येणार आहे.यानंतर उपराष्ट्रपती धनखर कोटा कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना संबोधित करतील.

### विद्यार्थिनींना गुरुमंत्र दिला

» धनखड यांनीही आपल्या भाषणात विद्यार्थिनींना गुरुमंत्र दिला. ते विद्यार्थिनींना म्हणाले - मी आज तुम्हाला एक किंवा दोन गुरु मंत्र देणार आहे. जीवनात नेहमी त्याचे अनुसरण करा. सर्वप्रथम, कधीही टेन्शन ठेवू नका. तणावामुळे काहीही होणार नाही. लोक म्हणतात की आकाश कोसळेल. हजारो वर्षांत एकदाही तो पडला नाही.तुमच्या मनात आणखी काही चांगली कल्पना आली असेल, तर तुमच्या मनाला पार्किंग स्टेशन बनवू नका. त्याची अंमलबजावणी करा. अयशस्वी होण्यास घाबरू नका. अपयशाशिवाय आजपर्यंत कोणताही विकास झालेला नाही.

# 'ईमानदारी का क्या करोगे ?

नावाच्या मालिकेची जोरदार चर्चा रंगली आहे. त्याला कारणही तसेच आहे. या मालिकेचा ट्रेलर आता सोशल मीडियावर प्रदर्शित झाला असून त्याला अल्पावधीत मिळालेला प्रतिसादही मोठा आहे. केके मेननची प्रमुख भूमिका असलेल्या या मालिकेची अनेक दिवसांपासून चर्चा होती.

ॲमेझॉन प्राईम व्हिडिओवर प्रदर्शित होणाऱ्या या मालिकेमध्ये सत्तरीच्या काळातील मुंबईचे दर्शन प्रेक्षकांना घडणार आहे. तेव्हा मुंबईमध्ये असणारी गुन्हेगारी, गुन्हेगारी विश्वाचे धागेदोरे, वेगवेगळे गुंड, त्यांच्या टोळ्या आणि टोळीयुद्ध यावर आधारित मालिकेतून




एका बड्या गुंडाची कथा उलगण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पोलिसांच्या हातावर नेहमीच तुरी देत सटकणाऱ्या त्या गुंडानं साऱ्या जगात आपल्या नावाची वेगळी ओळख तयार केली. पण याची सुरुवात कशी झाली, हे सांगणारी सीरिज म्हणून कडे पाहावे लागणार आहे. मधील संवाद हे फारच बोलके आणि प्रभावी आहेत. त्यांची गोष्टच वेगळी आहेत. त्यातील काही संवादाचा उल्लेख करायचा झाल्यास, जब इमानदारी भूख से टकराती है तो हमेशा हारती है. मैं ईमानदार था, पर दारा भूखा था...केके मेमनच्या आवाजातील या संवादांनी नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. यापूर्वी देखील केके मेननच्या स्पेशल ऑप्स सीरिजने प्रेक्षकांना भुरळ घातली होती. या सीरिजमध्ये १९७० च्या काळातील मुंबईचे दर्शन घडवण्यात आले असून तत्कालीन शहरातील राजकीय, सामाजिक परिस्थितीवर भाष्य करण्यात आले आहे. निर्मिती एक्सेल मीडिया आणि रितेश सिद्धवानी, कासिम जगमागिया आणि फरहान अख्तर यांनी केली आहे. ही वेबसीरिज प्रसिद्ध लेखक हुसैन झैदी यांच्या पुस्तकावर आधारित असल्याचे सांगण्यात आले आहे. त्याचे दिग्दर्शन शौजात सौदागर यांनी केले असून त्यात के के मेमन, अविनाश तिवारी, क्रितिका कामरा आणि निवेदिता भट्टाचार्य, अमायरा दस्तूर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# जॅकलिनसाठी प्राण्यांचे हॉस्पिटल?



200 कोटींच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात तुरुंगात असलेल्या सुकेश चंद्रशेखरने जॅकलिन फर्नांडिसला आणखी एक पत्र लिहिले आहे. यावेळी त्याने जॅकलिनसाठी हॉस्पिटल बांधण्याबाबत सांगितले आहे. सुकेशने लिहिले की, जॅकलीनला प्राणी खूप आवडतात, त्यामुळे तो बंगळुरूमध्ये प्राण्यांसाठी एक मोठे हॉस्पिटल उघडणार आहे. या रुग्णालयाच्या उभारणीसाठी 25 कोटी रुपये खर्च येणार असून त्याचे क्षेत्रफळ 25,000 स्क्वेअर फूट इतके आहे. या रुग्णालयात कुत्रे, मांजर, घोडे यांच्यासह सर्व प्राण्यांवर उपचार केले जाणार आहेत. सुकेशने जॅकलिनला लिहिलेल्या पत्रात लिहिले - जॅकलीनला नेहमी प्राण्यांसाठी काहीतरी करायचे होते, त्यामुळे तिच्या आनंदासाठी मी पाळीव प्राण्यांसाठी हॉस्पिटल बनवण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्या टीमने यासाठी एक फ्रेमवर्क तयार केले आहे. 11 सप्टेंबर 2023 पासून बांधकाम सुरू होईल. 11 ऑगस्ट 2024 पासून रुग्णालयातील कामही सुरू होईल. योगायोगाने तिचा वाढदिवसही त्याच दिवशी आहे. सुकेशने आपल्या पत्रात पुढे लिहिले आहे की, मी रुग्णालयाचे कंत्राट दक्षिण भारत आणि यूएईच्या सर्वोच्च बांधकाम कंपन्यांना दिले आहे. या कामात दिरंगाई होऊ नये, यासाठी आगाऊ पैसे देण्यात आले असून करारही करण्यात आला.

# लोक माझे छोटे डोळे सावळ्या रंगावर कमेंट करतात

आलिया भट्ट सारखी दिसणारी सेलेस्टी बैरागी आसामची आहे. सेलेस्टीच्या म्हणण्यानुसार, लोक तिला पसंत करतात मात्र काही लोक आहेत जे तिच्या लहान डोळे आणि सावळ्या रंगावर देखील टिप्पणी करतात. अलीकडेच दिव्य मराठीशी संवाद साधताना सेलेस्टीने नॉर्थ-ईस्टर्न इंडियन असल्यामुळे तिला कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते हे सांगितले. मी ईशान्येकडील आसाम राज्यातील आहे, त्यामुळे अनेकांना वाटते की माझी त्वचा चांगली नाही. एक गोष्ट जी मला खरच अस्वस्थ करत होती, ज्याने मला खूप दुखावलं होतं, ती म्हणजे माझ्या करिअरच्या सुरुवातीला लोक माझ्या डोळ्यांवर टीका करत असत. एका शूट दरम्यान मेकअप करत असताना काही लोक आले आणि म्हणाले की तू छान दिसत आहेस पण तुझे डोळे मोठे असते तर अजून सुंदर दिसली असतीस. मी हे सेटवर ऐकलं आणि मला खूप वाईट वाटलं. त्याआधी मी आसामबाहेर कधीही काम केले नव्हते, त्यामुळे त्यांच्या बोलण्यावर काय प्रतिक्रिया द्यावी हे त्यावेळी मला समजत नव्हते. त्यावेळी माझी आई माझ्यासोबत होती आणि माझ्या सहकलाकारांनीही मला साथ दिली. त्यांनी मला अशा टिप्पण्यांकडे दुर्लक्ष करण्याचा सल्ला दिला. पूर्वी खूप वाईट वाटायचे पण आता फारसा फरक पडत नाही. आताही लोक म्हणतात की तुझे डोळे मोठे असते तर तू सुंदर दिसली असती, गोरी असती तर बरे झाले असते, तू जरा उंच आणि पातळ असायला हवी होतीस. ते माझ्या चेहऱ्याच्या आकारावरही भाष्य करतात. मला समजत नाही की ही सुंदर दिसण्याची यादी कोण बनवत आहे? एक चांगला अभिनेता होणं तुमच्यासाठी खूप महत्त्वाचं आहे. आपल्या इंडस्ट्रीमध्ये आता बरीच सुधारणा झाली आहे, परंतु मला आशा आहे की हा बदल संपूर्ण भारतात येईल मी आसाममध्ये होते आणि वेब फिल्म शूट करण्यासाठी तिथे पोहोचलो होते. तिथल्या विमानतळावर उतरताच माझ्या सोशल मीडियाला बूस्ट मिळाल्याचं लक्षात आलं. अचानक अनेक फोन येऊ लागले.



# आयुष्यातला प्रवास खूप काही शिकवून जातो!

मराठी चित्रपट विश्वामध्ये आणखी एका चित्रपटाची चाहत्यांना बऱ्याच दिवसांपासून उत्सुकता असल्याचे दिसून आले आहे. सध्या मराठी चित्रपटांची मोठी क्रेझ आहे. बाईपण भारी देवा नंतर सुभेदार, आता बापल्योक चित्रपटांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. यासगळ्यात




आणखी एका मराठी चित्रपटाची मोठी चर्चा रंगताना दिसत आहे. तो चित्रपट म्हणजे जर्नी. एका असामान्य संघर्षाच्या प्रवासाची गोष्ट सांगणारा 'जर्नी' चित्रपट येत्या ६ ऑक्टोबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सचिन दाभाडे फिल्म्स प्रस्तुत, सचिन जीवनराव दाभाडे निर्मित 'जर्नी' चित्रपटाचे नवीन पोस्टर सोशल मीडियावर झळकले असून यात शंतनू मोघे, शर्वरी जेमेनीस आणि शुभम मोरे दिसत आहे. पोस्टरवरून हा एक भावनिक, कौटुंबिक चित्रपट असल्याची चर्चा आहे. सचिन जीवनराव दाभाडे दिग्दर्शित या चित्रपटात अंजली उजवणे, योगेश सोमण, ओमकर गोवर्धन, सुनील गोडबोले, मिलिंद दास्ताने यांच्यासह माही बुटाला आणि निखिल राठोड या बालकलाकारांच्याही प्रमुख भूमिका आहेत. रवींद्र मठाधिकारी लिखित या चित्रपटाची कथा सचिन दाभाडे यांची आहे तर भास्कर देवेंग्रेकर, तानाजी माने, संतोष राठोड, अनिकेत अरविंद बुटाला सहनिर्माते आहेत. पोस्टरमध्ये तिघांच्याही चेहऱ्यावरील गंभीर भाव खूप काही सांगून जाणारे आहे.

# मिचेल मार्शने केला धमाका!

## » 180च्या स्ट्राइक रेटने धावा करत मोडला 'विराट' विक्रम

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**मिचेल मार्शच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलिया संघाने तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत दक्षिण आफ्रिकेचा ३-० असा क्लीन स्वीप केला आणि या मालिकेत कांगारूंचा कर्णधार मार्शने अप्रतिम फलंदाजी केली. या मालिकेत सर्वाधिक धावा केल्याबद्दल त्याला प्लेअर ऑफ द सिरीज घोषित करण्यात आले.**

या मालिकेत मिचेल मार्शने विराट कोहलीच्या एका विक्रमाची बरोबरी केली, तर कर्णधार म्हणून विराट कोहलीचा दुसरा विक्रम मोडीत काढत.तो त्याच्याही पुढे गेला. मार्शने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत सर्वाधिक १८६ धावा केल्या. तसेच कर्णधार म्हणून तो तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत कोणत्याही संघाविरुद्ध सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. याआधी, तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम कोहलीच्या नावावर होता. त्याने २०१९ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध १८३ धावा केल्या होत्या. आता मिचेल मार्श त्याला मागे टाकून त्याच्या पुढे गेला आहे. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर केन विल्यमसन आहे, ज्याने २०१६ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत कर्णधार म्हणून १७५ धावा केल्या होत्या. टी-२० मालिकेत कर्णधार म्हणून १८०च्या स्ट्राइक रेट आणि सरासरी पेक्षा जास्त धावा करणारा मिचेल मार्श




### मिचेल मार्शने केली कोहलीची बरोबरी

» टी-२० मालिकेत कर्णधार म्हणून १८०च्या स्ट्राइक रेट आणि सरासरी पेक्षा जास्त धावा करणारा मिचेल मार्श हा विराट कोहलीनंतरचा दुसरा फलंदाज ठरला. मार्शने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत १८६ च्या सरासरीने आणि १८६ च्या स्ट्राइक रेटने १८६ धावा केल्या. या सामन्यांमध्ये त्याने २ अर्धशतके झळकावली आणि त्याची सर्वोत्तम धावसंख्या नाबाद ९२ होती. यादरम्यान त्याने २४ चौकार आणि ८ षटकारही मारले.

हा विराट कोहलीनंतरचा दुसरा फलंदाज ठरला. मार्शने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत १८६ च्या सरासरीने आणि १८६ च्या स्ट्राइक रेटने १८६ धावा केल्या. या सामन्यांमध्ये त्याने २ अर्धशतके झळकावली आणि त्याची सर्वोत्तम धावसंख्या नाबाद ९२ होती. यादरम्यान त्याने २४ चौकार आणि ८ षटकारही मारले. विराट कोहलीबद्दल सांगायचे तर, त्याने २०१९ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेत कर्णधार म्हणून १८० पेक्षा जास्त सरासरी आणि स्ट्राइक रेटने धावा केल्या होत्या. आता टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात, कोहली आणि मार्श हे दोनच कर्णधार आहेत, ज्यांनी तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत कोणत्याही संघाविरुद्ध स्ट्राइक रेटने आणि १८० पेक्षा जास्त सरासरीने धावा केल्या आहेत.

# बांगलादेशचे आशिया चषकातील आव्हान कायम!

## » अफगाणिस्तानवर 89 धावांनी दणदणीत विजय

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**आशिया कपच्या चौथ्या सामन्यात बांगलादेशने अफगाणिस्तानचा ८९ धावांनी दणदणीत पराभव केला. लाहोरमधील गद्दाफी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रविवारी (३ सप्टेंबर) झालेल्या या सामन्यात बांगलादेशने दमदार विजय मिळवत 'ब' गटात आपले खाते उघडले. आता त्याचे दोन सामन्यांत दोन गुण झाले असून सुपर-४ मध्ये जाण्याच्या त्याच्या आशा जिवंत आहेत. दुसरीकडे अफगाणिस्तानला पहिल्याच सामन्यात पराभव पत्करावा लागला आहे.**




'ब' गटात बांगलादेशने अफगाणिस्तानचा ८९ धावांनी पराभव करत मोठा विजय मिळवला आहे. आता त्याचे दोन सामन्यांत दोन गुण झाले असून सुपर-४च्या त्याच्या आशा कायम आहेत. दुसरीकडे अफगाणिस्तानने स्पर्धेतील पहिला सामना गमावला आहे. संघाचे एका सामन्यात शून्य गुण आहेत. बांगलादेशचे गट फेरीतील दोन्ही सामने झाले आहेत. त्याचबरोबर अफगाणिस्तानला श्रीलंकेविरुद्ध सामना खेळायचा आहे. गट-ब मधून सुपर-४ मध्ये कोणते संघ जातील हे या सामन्यातून ठरेल. श्रीलंकेचे एका सामन्यात दोन गुण आहेत. आजच्या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार शाकिब अल हसनने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. त्यांच्या संघाने हा निर्णय योग्य असल्याचे दाखवत ५० षटकांत ५ बाद ३३४ धावा केल्या. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानचा संघ ४४.३ षटकांत २४५ धावांवर गारद झाला. त्यांच्याकडून इब्राहिम झद्रानने ७५ आणि कर्णधार हशमतुल्लाह शाहिदीने ५१ धावा केल्या. या दोघांशिवाय एकाही फलंदाजाने जास्त वेळ फलंदाजी करता आली नाही. रहमत शाहने ३३ धावा केल्या, पण चांगली सुरुवात करून तो बाद झाला. बांगलादेशकडून तस्किन अहमदने चार आणि शरीफुल इस्लामने तीन विकेट्स घेतल्या. हसन महमूद आणि मेहदी हसन मिराज यांना प्रत्येकी एक गडी बाद करण्यात यश मिळाले. याआधी बांगलादेशकडून मेहदी हसन मिराज (११२) आणि नजमुल हुसेन शांतो (१०४) यांनी शतके झळकावली. पहिला सामना श्रीलंकेकडून पाच गडी राखून हरल्यानंतर बांगलादेशने अफगाणिस्तानविरुद्ध चांगली सुरुवात केली. मेहदी आणि नजमुल यांनी तिसऱ्या विकेटसाठी १९६ धावांची भागीदारी केली. मिरज येथे निवृत्त दुखापत झाली. नजमुल बाद झाल्यामुळे तिसऱ्या विकेटसाठी २१५ धावांची भागीदारी तुटली. मोहम्मद नईम (२८) आणि मेहदी यांनी पहिल्या विकेटसाठी ६० धावा जोडल्या. येथे अफगाणिस्तानने चार चेंडूत नईम आणि तौहीद (०) यांच्या विकेट्स घेत पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, पण मिराज आणि नजमुलने बांगलादेशला पुन्हा ताब्यात घेतलेच नाही तर त्यांना मोठ्या धावसंख्येकडे नेले. मिराज आणि नजमुल या दोघांनीही वनडेमधली दुसरी शतकं झळकावली. मिरजेची ही वन डेतील आतापर्यंतची सर्वोत्तम खेळी ठरली.

### बांगलादेशचा मोठा विजय

» 'ब' गटात बांगलादेशने अफगाणिस्तानचा ८९ धावांनी पराभव करत मोठा विजय मिळवला आहे. आता त्याचे दोन सामन्यांत दोन गुण झाले असून सुपर-४च्या त्याच्या आशा कायम आहेत. दुसरीकडे अफगाणिस्तानने स्पर्धेतील पहिला सामना गमावला आहे. संघाचे एका सामन्यात शून्य गुण आहेत. बांगलादेशचे गट फेरीतील दोन्ही सामने झाले आहेत. त्याचबरोबर अफगाणिस्तानला श्रीलंकेविरुद्ध सामना खेळायचा आहे. गट-ब मधून सुपर-४ मध्ये कोणते संघ जातील हे या सामन्यातून ठरेल. श्रीलंकेचे एका सामन्यात दोन गुण आहेत.